अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# गर्दुल्ल्यांची गर्दी आणि अपुरी पडणारी कारागृहे

एखादी साधी गोष्टसुध्दा एखाद्या मोठ्या सामाजिक दुरावस्थेकडे लक्ष वेधू शकते. परंतु ती बाब इतकी साधी वाटते की, त्याकडे फारसे कोणाचे लक्ष जात नाही. किंबहुना अशा छोट्या-छोट्या गोष्टींकडेसुध्दा लक्ष ठेवण्याची किंवा त्याची दखल घेण्याची व्यवस्था आपल्याकडे नाही किंवा तशी यंत्रणाही नाही. याचे ताजे उदाहरण म्हणजे मुंबई आणि मुंबईजवळच्या तीन कारागृहांमध्ये कैद्यांची संख्या भरमसाट वाढल्याचे आढळून आले आहे. विशेषत: मादक पदार्थ सेवन करणारे किंवा त्याची विक्री करणाऱ्यांमुळे कारागृहांमध्ये कैद्यांची गर्दी होत असल्याचे कारागृहप्रमुखांनीच सरकारच्या लक्षात आणून दिले. कारागृह विभागाच्या महासंचालिका मीरा बोरवणकर यांनी मुंबई पोलीस आयुक्त राकेश मारिया यांना पत्र पाठवून अशा गर्दुल्ल्यांना किंवा मादक पदार्थ विक्रीप्रकरणी अटक झालेल्यांना यापुढे ऑर्थर रोड, ठाणे आणि तळोजा कारागृहांमध्ये पाठवू नये, अशा प्रकारची सूचना केली आहे. गर्दुल्ल्यांची या कारागृहांमध्ये होणारी गर्दी इथल्या सुरक्षा व्यवस्था आणि एकूण व्यवस्थापनावर ताण निर्माण करीत असल्याचे बोरवणकर यांनी आपल्या पत्रातून लक्षात आणून दिले आहे. अतिशय साधी वाटणारी ही गोष्ट केवळ कारागृहातल्या गर्दीपुरती मर्यादित राहत नाही. तर मुंबई, ठाणे परिसरामध्ये मादक पदार्थांची विक्री, पुन्हा ते सेवन करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. याचेच ते निदर्शक ठरते. याचा अर्थ मोठ्याप्रमाणावर मादक पदार्थांची विक्री किंवा तस्करी मुंबई परिसरामध्ये सुरू आहे. या व्यसनाला बळी पडणारे श्रीमंत घरातले लोक असतात. त्यापेक्षाही गरीब किंवा रस्त्यावर भीक मागून पोट भरणाऱ्यांची संख्याही जास्त असते. या लोकांचा उपयोग करून मादक पदार्थांची भरपूर विक्री करण्याचे काम या व्यवसायातले तस्कर करतात. अशा गर्दुल्ल्यांची कारागृहांमध्ये गर्दी व्हावी आणि त्याला रोखण्याची विनंती कारागृहाच्या महासंचालकांना करण्याची वेळ यावी, यावरून ही समस्या किती गंभीर झालेली आहे हे सहज लक्षात येते. अशा लोकांना आवर घालण्यासाठी आज असलेले कायदेशीर उपाय अपुरे पडत आहेत हेदेखील त्यांच्या संख्येवरून लक्षात येते. खरे तर मादक पदार्थांचे सेवन किंवा विक्री करणाऱ्यांची संख्या वाढणे ही सामाजिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक बाब म्हणावी लागेल. यावरून मादक पदार्थांचा ओघ सरकारी पातळीवरून रोखला गेलेला नाही. पोलीस यंत्रणा त्यात पूर्णपणे यशस्वी झालेली नाही किंवा अन्य प्रकारच्या मार्गाने मादक पदार्थांची आयात सुरूच आहे. तेदेखील कायद्याने रोखणे शक्य झाले नाही असेच म्हणावे लागेल. छोटी वाटणारी ही गोष्ट सामाजिकदृष्ट्या धोकादायक आणि कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने तितकीच धक्कादायक ठरते.

### कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न

मुळातच समाजातली एकूण गुन्हेगारी वाढत चालली आहे. कारागृहे अपुरी पडावीत अशी आज विचित्र परिस्थिती उद्‌भवलेली आहे. समाज जेवढा सुशिक्षित होत आहे तितकाच तो गुन्हेगारीकडेसुध्दा वळताना दिसतो. चांगले शिकले सवरलेले लोक कोणत्या वेळी कशा प्रकारचा गुन्हा करतील याचा कोणताही भरोसा नाही. मग एखाद्या अभिनेत्रीशी गैरव्यवहार करण्याचा प्रकार असेल किंवा एखाद्या राजकीय पुढाऱ्याचे प्रेमप्रकरण असेल. इथपासून ते मित्रा-मित्रांमधल्या शत्रूत्वातून गुन्हेगारी वाढताना दिसून येते. गेल्याच आठवड्यात घणसोली इथे एका इंजिनीअरिंग विद्यार्थ्याची लोकलमध्ये हत्या केली गेली. करी रोड इथे मित्राला जाब विचारण्यावरून बाचाबाची झाली आणि त्यात एका मित्राला प्राण गमवावे लागले. याशिवाय महिलांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. पैशाच्या मोहापायी कोण कोणाचा जीव घेईल याचा भरोसा राहिलेला नाही. अशा चित्रविचित्र परिस्थितीमध्ये कारागृहे तेवढीच राहिली, पण तिथल्या गुन्हेगारांची संख्या मात्र दुपटीने वाढत गेली अशी आज परिस्थिती आहे. ज्या ऑर्थर रोड जेलमध्ये केवळ आठशे कैद्यांना ठेवण्याची व्यवस्था आहे.पण तिथे आज पंधराशे कैद्यांना कोंबले गेले आहे. ठाणे मध्यवर्ती कारागृहाची क्षमता चौदाशे कैद्यांची असताना तिथे दोन हजार कैदी ठेवले आहेत. तर तळोजा कारागृहात अठराशे कैदी ठेवता येऊ शकतात तिथे आज दोन हजार कैद्यांना डांबले गेले आहे. ज्यावेळेला दोन एकरवर पसरलेले ऑर्थर रोड आणि ठाणे जेल गुन्हेगारांसाठी अपुरे पडू लागले, त्यावेळी तळोजा जेल नव्याने बांधले गेले. आता जर तेदेखील अपुरे पडत असेल तर गुन्हेगारांची संख्या किती वेगाने वाढते हे सिध्द होते. किंबहुना या साध्या वाटणाऱ्या गोष्टीमुळेसुध्दा राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्नदेखील तितकाच गंभीर बनला असल्याचे दिसून येते. एकीकडे गुन्हेगारी कमी होत असल्याचा दावा राज्य सरकार किंवा पोलीस यंत्रणा करीत असतात. परंतु त्याचवेळेला कारागृहात गर्दी वाढत असल्याचेही पोलिसांकडूनच अधिकृतपणे सांगितले जाते. मग याचा अर्थ काय काढायचा? ऑर्थर रोड, ठाणे किंवा तळोजा जेल इथली क्षमता आता वाढवता येऊ शकत नाही. नव्याने बांधलेले तळोजा जेलही अपुरे पडू लागले आहे. याचाच अर्थ ठाणे, मुंबई किंवा नवी मुंबई परिसरामध्ये पुन्हा आता एखाद्या नव्या मोठ्या मध्यवर्ती कारागृहाची मदत भासेल, असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही. कैद्यांची ही वाढती गर्दी नियंत्रणात ठेवणे कठीण होत आहे.

### गंभीर समस्येचा इशारा

जर कैद्यांच्या वाढीचे प्रमाण जर असेच राहिले तर इतर गुन्हेगारीबरोबर मादक पदार्थाच्या तस्करीचा आणि त्याचे सेवन करणाऱ्या व्यसनाचा विळखादेखील वाढला आहे. केवळ असे कैदी कारागृहात पाठवल्यामुळे गर्दी वाढत आहे. अशी तक्रार करून भागणार नाही. मुळात या समस्येचा नायनाट कसा करता येईल त्याचादेखील विचार व्हायला हवा किंवा एकूण कारागृहाच्या संख्येपैकी जर पंचवीस टक्के कैदी हे मादक पदार्थांच्या संदर्भात अटक केलेले असतील तर अशा कैद्यांसाठी काही वेगळी व्यवस्था करता येईल का याचाही विचार करावा लागेल. त्यांची व्यसनातून मुक्तता करण्याकरिता हे मादक पदार्थ जिथून येतात किंवा पुरवले जातात त्याचादेखील कायमचा बंदोबस्त करण्याची मोहीम पोलिसांना हाती घ्यावी लागेल. प्रामुख्याने तरुण पिढी बरबाद करणारी समस्या एका मोठ्या सामाजिक समस्येचाच भाग ठरते. पोलिसांच्या सतर्कतेने एवढे कैदी पकडता आले. परंतु पोलिसांना गुंगारा देऊन यापेक्षाही दुप्पट कैदी बाहेर असतात. या वस्तुस्थितीकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. या सर्व आनुषंगिक बाबींचा विचार केला तर सामाजिक पातळीवर या समस्येचा मुकाबला जनजागृती करूनही करावा लागेल. आणि कायदा सुव्यवस्थेच्या पातळीवर अधिक कठोर कायदे करून, तसेच सुरक्षा व्यवस्था वाढवून मादक पदार्थांची आयात थांबवावी लागेल. म्हणूनच ही साधी वाटणारी समस्या भविष्यासाठी गंभीर इशारा ठरते.